म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
क्र. नं. २०२१
१९२०

माळा पुष्प दुसरें.

# जालियनवाला.

" वसन्तविहार. "

...२०.

...२ आणा.

REFBK-0001797
REFBK-0001797

## [ जालियनवाला. ]

[ चालः–उद्धवा शांतवन कर जा. ]

हा नाद कोठुनी आला । 'हा तोच जालियनवाला' ॥ धृ० ॥

कालाच्या खल सर्पाला । मंत्रानें झेला केला ।
पोषियल्या तरु वेलींला । येतां नव रंग तयाला ।
लागतां कुठार मुळाला । पूर्विचा रंग
अग्निचा स्पर्श दारूला ।
वायुची मदत वरि त्याल
ये स्वरूप परिपाकाला ।
तरु वेलींचीही जनता । ये वाचा केशी त्याला ॥ १ ॥

परि चित्तीं क्षुब्ध जहालीं । ती दिसली लाल जनाला ।
नरनारींच्या रूपानें । 'सत्याग्रह' त्यांनीं केला ।
'सत्याग्रह' सत्यासाठीं । परि संशय अधिकाऱ्यांला ॥
ज्या जागीं कांहीं नव्हतें ।
पायाविण मंदिर तेथें ।
रात्रींत उभविलें नुसतें ।
निज सुखार्थ एक्या जागीं । तो मेळा नच पाहवला ॥ २ ॥

तरु वेलींना चिरडाया । नलिकांचा मारा झाला ।

REFBK-0001797

जाळ्यांत सिंह सांपडला । तें दुःख वदूं कवणाला ।
चिरडलीं बापुडीं कोणीं । किति गेलीं स्वर्गपदाला ॥
हे नंदनंदना बाळा !
हे किसन कन्हय्या लाला !
हे मुरलीधर गोपाळा !
सोडिवरे सोडिव आह्मां । कितिकांनीं धांवा केला ॥ ३ ॥
गोळ्यांचा पाउस पडला । रुधिराचा चिखल जहाला ।
किति धडें गडप हो त्यांत । हा हिशेब कोणी केला ।
हें क्रूर कर्म हांतांना । ये अधिक हर्ष सत्तेला ॥
और चढाव गोळी वदती ।
स्वर्गाच्या शिखरीं चढती ।
जणुं मिळे तयांना बढती ।
साहित्य सरे माऱ्याचें । तों मारा बंद जहाला ॥ ४ ॥
बापासह पोरें आलीं । अजि पितर कशाचे त्याला ।
कवणाचे हात गळाले । मुखवटे नसति कवणाला ।
हा तोबा कत्तल असली । दिसली न कधीं कवणाला ॥
नलिकांची दारू सरली ।
कत्तलिला शक्ति न उरली ।
सत्तेची वेळा भरली ।

[stamp]

कांहींच उपाय न उरला । मग बंद धडाका झाला ॥ ५ ॥

अमितांचे खून जहाले । 'खुनि बाग' ह्मणा हो याला ।
नरनारी तरु वेली या । जनतार्थी स्वर्गपदाला ।
गेल्या हें दावायाला । 'हा तोच जालियनवाला' ॥
या येथें नीट पहा हो ।
मृत आत्मे फोडिति टाहो ।
ते शब्द ऐकण्या याहो ।
अणुरेणुंत यांच्या मूर्ति । घेतील जन्मकार्याला ॥ ६ ॥

जगणें न जरी उपकारी । तरि जगणें फोल कशाला
द्यावया धडे हक्काचे । ही असे जगाला शाळा ।
शांतिचें स्तोम गावोनी । हें क्रूर कर्म करण्याला ॥
सोडुनी धर्मनीतीतें ।
त्यागुनी लोक-भीतीतें ।
वर्जुनी योग्य रीतीतें ।
जे धजले त्यांच्या लोकां । आदर्श मुखें बघण्याला ॥ ७ ॥

नेसतें वसन डोक्याला । वेष्टिले अशा लोकांला ।
हित सत्य शब्द सांगाया । 'हा तोच जालियनवाला' ।
मरणें हें सुटलें कोणा । परि मान जिवंतपणाला ॥
जग सगळें मानासाठीं ।
खर्चुनी ज्ञान जें गांठीं ।

फिरतात पृथ्विचे पाठीं ।
जगण्यांत जिवंतपणा ना । मग जगतां मानव मेला ॥ ८ ॥
दैवांत जिवंतपणा तो । यत्नाविण कोणा आला ।
त्या पाहुनि भारतवासी ! । दाखवी 'जालियनवाला' ।
जे मेले जन या जागीं । त्या मरण कशाचें बोला ॥
त्या खुले स्वर्ग-दरवाजे ।
ते हंस मुक्ति त्या साजे ।
ध्रुवसमान कीर्ति विराजे ।
अमरीं त्या मान मिळाला । ते पावति अमरत्वाला ॥ ९ ॥
हा 'अमरबाग' हो ज्यांचा । 'हा तोच जालियनवाला' ।
हा बाग असे अमरांचा । या 'अमरबाग' अजि बोला ॥
या दर्शन घ्याया याहो । दाखवा कृत्य जगताला ॥
दिल्‌रुबा करीत बहार ।
गातसे 'वसन्तविहार' ।
रसिकांवरि पूर्ण मदार ।
कवि डोलत बोलत बोला । 'हा तोच जालियनवाला'॥ १०

———०———

REFBK-0001797

REFBK-0001797

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.
ता.
ठाणे.

मुद्रक-रा. रा. गजानन रघुनाथ मुळे, यांनीं 'पुरंदरे
कं. प्रिं. प्रेस, ठाकुरद्वार-मुंबई, येथें छापिलें.

प्रकाशक-शंकर दत्तात्रय जोशी,
मधुसुदन दामोदरची चाळ दादर-मुंबई.

ग्रंथ संग्रहालय
दा. क्र.